दाखल तारीखः ०४/०३/२०१६
दाखल तारीखः ०४/०३/२०१६
निकाल तारीखः ०८/०३/२०२१
कालावधीः ०५ वर्ष ००म. ०४दि.

**सातारा येथील ३ रे प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, सातारा यांचे न्यायालयात**
(पिठासीन अधिकारी श्रीमती. आर. व्ही. पाटील)

**संक्षिप्त फौजदारी खटला क्र. ३२३/२०१६**
**(सदरचा खटला नियमीत खटला म्हणून चालविण्यात आला.)**
**(CNR No. MHST03-000685-2016)**
**निशाणी –**

महाराष्ट्र सरकार तर्फे पोलीस निरीक्षक, }
बोरगांव पोलीस स्टेशन, सातारा } ....... **अभियोग पक्ष**
ता. जि. सातारा. }

**– विरुध्द –**

तानाजी मुरलीधर कमाने, }
वयः ३२ वर्ष, व्यवसायः मजुरी, }
रा. सासपडे, ता. जि. सातारा. } ....... **आरोपी**

**दोषारोपः मुंबई मद्यनिषेध कायदा, १९४९ चे कलम ६५(क)(ड)(ई) अन्वये.**

**सदर कामातील विधीज्ञः सरकारतर्फेः श्री. यु. एस. पवार.**
**आरोपीतर्फेः श्री. डी. एल. जाधव.**

# न्यायनिर्णय

(घोषित दिनांक ०८/०३/२०२१)

आरोपी मुंबई मद्यनिषेध कायदा, १९४९ चे कलम ६५(क)(ड)(ई) अन्वये दंडनीय अपराध केलेचे आरोपावरुन चालविण्यात आलेल्या संपरिक्षेस सामोरा जात आहे.

**<u>अभियोग पक्षाची थोडक्यात हकीकत खालीलप्रमाणेः–</u>**

२. दिपक विठ्ठल मांडवे यांनी घटनेची फिर्याद दिली. दिनांक १८/०२/२०१६ रोजी ते कार्यालयात हजर असताना सहाय्यक पोलीस निरीक्षक यांनी त्यांना सांगितले की, त्यांना बातमीदारांमार्फत बातमी मिळाली आहे की, मौजे सासपडे, ता. जि. सातारा या गावचे हद्दीत एक इसम नामे तानाजी मुरलीधर कमाने हा बेकायदेशीरपणे बिगर परवाना देशी दारुची चोरटी विक्री करीत आहे. त्यामुळे त्यांनी दोन पंचाना बोलावून घेवून त्यांना बातमीचा आशय समजावून सांगितला व त्यांना छापा टाकण्याच्या कामी पंच म्हणून उपस्थित राहण्याची विनंती केली. पंचानी ती विनंती मान्य केल्यानंतर ते स्वतः, पोलीस हवालदार कुंभार तसेच दोन पंच असे सर्वजण त्यांच्या ताब्यातील खाजगी वाहनाने मौजे सासपडे, ता. जि. सातारा या गावी गेले. त्यांनी त्यांच्या ताब्यातील वाहन बातमीच्या ठिकाणापासून काही अंतरावर थांबवले व बातमीच्या ठिकाणी पायी चालत जावून १०:४५ वाजता छापा टाकला असता तेथे एक इसम त्याच्या घराच्या आडोशाला त्याच्या पुढयात प्लॅस्टिक पोत्याची पिशवी घेवून बसलेला दिसला. त्यांची चाहूल लागताच तो इसम पळून जावू लागला त्यावेळी त्यांनी त्याचा पाठलाग करुन त्याला पकडले. त्याच्याजवळ असलेल्या प्लॅस्टिक पोत्याच्या पिशवीमध्ये देशी दारु रॉयल चॉईस संत्राच्या १८० मि. ली.च्या एकूण २० सिलबंद बाटल्या मिळून आल्या. पोलीस हवालदार कुंभार यांनी दोन पंचासमक्ष सदर ठिकाणी मिळून आलेल्या मुद्देमालातून १८० मि. ली. क्षमतेची एक सिलबंद बाटली नमुना तपासणीसाठी काढून घेवून कागदी लेबले लावून वरुन लाखी सील केले व उरलेला सर्व मुद्देमाल जप्त करुन ताब्यात घेतला. आरोपीस अटक करुन ताब्यात घेतले व त्याच्याविरुध्द फिर्याद दाखल केली.

३. सदरची फिर्याद गुन्हा रजिस्टर नंबर २८/२०१६ अन्वये मुंबई मद्य निषेध

कायदा १९४९ चे कलम ६५ (क)(ड)(ई) नुसार नोंदविण्यात आली. त्यानंतर तपासी अधिकारी पोलीस हवालदार सी. एस. कुंभार यांनी सदर घटनेचा तपास केला. त्यांनी साक्षीदारांचे जबाब नोंदविले, घटनास्थळाचा पंचनामा केला व घटनेचा तपास पूर्ण करुन आरोपीविरुध्द दोषारोपपत्र दाखल केले.

४. दिनांक २२/११/२०१६ रोजी आरोपीविरुध्द मुंबई मद्यनिषेध कायदा, १९४९ चे कलम ६५(क)(ड)(ई) अन्वये आरोप निश्चित (नि. क्र. ७) करुन आरोपीला मराठीत वाचून दाखविले. आरोपीने (नि. क्र. ८) अन्वये आरोप नाकबुल केला व खटला चालविण्याची विनंती केली. खोटा खटला दाखल केलेचा आरोपीने बचाव घेतला आहे. आरोपीचे फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३ प्रमाणे निवेदन नि. क्र. ३३ वर नोंदविण्यात आले.

५. आरोपीविरुध्द ठेवण्यात आलेला दोषारोप, त्या अनुषंगाने सरकार पक्षाने सादर केलेला तोंडी व लेखी पुरावा, त्यास आरोपीने घेतलेला बचाव इत्यादीवरुन खालील मुद्दे माझे विचाराधीन आलेले आहेत. त्यावरील निष्कर्ष कारणमीमांसेसह त्यापुढे नमुद केलेले आहेत.

| **अ. नं.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | अभियोग पक्षाने हे शाबीत केले आहे का की, आरोपीने दिनांक १८/०२/२०१६ रोजी सुमारे १०:४५ वाजता मौजे सासपडे, ता. जि. सातारा गावच्या हद्दीत राहते घराच्या आडोशास बेकायदा, बिगर परवाना, देशी दारु रॉयल चॉईस संत्राच्या १८० मि.ली.च्या रक्कम रुपये ९४७/– च्या एकूण २० सिलबंद बाटल्या स्वतःच्या अर्थिक फायद्याकरीता विक्री करण्याच्या उद्देशाने बाळगून | नाही. |

असताना मिळून आला आणि म्हणून त्याने मुंबई मद्यनिषेध कायदा कलम ६५(क)(ड)(ई) अन्वये गुन्हा केला आहे ?

२. काय आदेश ? — आरोपीची निर्दोष मुक्तता करण्यात येते.

## <u>कारणमिमांसा</u>

**६.** अभियोग पक्षाने आरोपीवर ठेवण्यात आलेला दोषारोप शाबीत करण्यासाठी फिर्यादी दिपक विठ्ठल मांडवे (साक्षीदार क्र. १) यांची साक्ष नि. १७ वर, पंच साक्षीदार बबन शंकर शिंदे (साक्षीदार क्र. २) यांची साक्ष नि. २६ वर तसेच तपासी अंमलदार चंद्रकांत शंकर कुंभार (साक्षीदार क्र. ३) यांची साक्ष नि. ३० वर नोंदविलेली आहे.

**<u>मुद्दा क्र. १ करीताः</u>–**

**७.** अभियोग पक्षातर्फे तपासण्यात आलेले फिर्यादी दिपक विठ्ठल मांडवे (साक्षीदार क्र. १) यांनी त्यांच्या सरतपासात असे कथन केले आहे की, ते फेब्रुवारी २०१६ मध्ये बोरगांव पोलीस स्टेशन येथे कॉन्स्टेबल म्हणून कार्यरत होते. दिनांक १८/०२/२०१६ रोजी पोलीस निरीक्षक बोरगांव पोलीस स्टेशन यांना बातमीदारांमार्फत बातमी मिळाली की, मौजे सासपडे गांवी दारुची चोरटी विक्री होत आहे. त्यामुळे वरिष्ठांच्या आदेशानुसार ते व त्यांच्यासोबत कॉन्स्टेबल कुंभार व इतर दोन पंच असे एकत्रित खाजगी वाहनाने बातमीच्या ठिकाणी छापा टाकण्यासाठी गेले. सासपडे गांवी बातमीच्या ठिकाणी ते सकाळी सुमारे १०.३० वाजता पोहचले, त्यांच्या ताब्यातील खाजगी वाहन बाजुला त्यांनी उभे केले व बातमीच्या ठिकाणी पायी चालत जावून १०.४५ वाजता छापा टाकला. त्यावेळी तेथे एक इसम काहीतरी विक्री करत असल्याचे त्यांना आढळून आले. त्यावेळी त्यांची चाहुल लागताच तो इसम तेथून पळून जाण्याच्या तयारीत असताना त्यांनी त्याला

जागीच पकडले. सदर इसम हा तानाजी मुरलीधर कमाने होता. त्यावेळी त्याच्या ताब्यातील पोत्यात त्यांना देशी दारु रॅायल चॅाईस संत्राच्या १८० मि.ली.च्या २० बाटल्या किंमत रक्कम रुपये ९४७/– चा माल मिळून आला. त्या मुद्देमालाचा त्यांनी पंचासमक्ष पंचनामा करुन सदर मुद्देमाल जप्त केला. त्यातील एक बाटली रासायनिक विश्लेषणाकरीता काढून घेतली व उर्वरीत मुद्देमाल व आरोपीला ताब्यात घेवून ते पोलीस स्टेशनला आले व त्यांनी आरोपीविरुध्द फिर्याद दाखल केली.

८. अभियोग पक्षातर्फे पंचनामा शाबित करयासाठी पंच साक्षीदार बबन शंकर शिंदे (साक्षीदार क्र. २) यांची साक्ष नोंदविलेली आहे. त्यांनी त्यांच्या साक्षीमध्ये पंचनाम्यावरील सही वगळता कोणताही मजकूर मान्य केलेला नाही. अभियोग पक्षाने उलटतपासणीमध्ये सूचक प्रश्न विचारले असता त्यांनी सर्व प्रश्नांची उत्तरे नकारार्थी दिलेली आहेत.

९. अभियोग पक्षातर्फे तपासण्यात आलेले तपासी अंमलदार चंद्रकांत शंकर कुंभार (साक्षीदार क्र. ३) यांनी त्यांच्या सरतपासात असे कथन केले आहे की, दिनांक १८/०२/२०१६ रोजी त्यांची नेमणूक बोरगांव पोलीस स्टेशन येथे होती. त्या दिवशी सहाय्यक पोलीस निरीक्षक कदम यांना गुप्त बातमीदारांमार्फत बातमी मिळाली की, सासपडे गावी तानाजी कमाने हा चोरटी दारुची विक्री करीत आहे. त्यामुळे त्यांनी पोलीस कॉन्स्टेबल मांडवे व दोन पंचाना घेवून सासपडे गावी जावून मिळालेल्या बातमीनुसार सासपडे गावी तानाजी कमाने याच्या घराजवळ छापा टाकला. त्यावेळी तानाजी कमाने याच्याजवळ एका प्लॅस्टिकच्या पिशवीमध्ये २० काचेच्या १८० मि. ली.च्या देशी दारुच्या सिलबंद बाटल्या मिळून आल्या. त्यावेळी त्यांनी दोन पंचासमक्ष घटनास्थळ व जप्तीचा पंचनामा तयार केला. त्यानंतर त्यातील एक बाटली रासायनिक विश्लेषणाकरीता पंचासमक्ष

काढून घेतली व सिलबंद केली. त्यानंतर पंचासमक्ष सिलबंद केलेली बाटली रासायनिक विश्लेषणाकरीता पाठवून अन्य जप्त मुद्देमाल पोलीस स्टेशनला जमा करण्यात आला. त्यानंतर पोलीस कॉन्स्टेबल दिपक मांडवे यांनी पोलीस स्टेशनला येवून फिर्याद दाखल केली. गुन्हयाचा तपास त्यांच्याकडे सोपविण्यात आला. त्यामुळे त्यांनी रासायनिक विश्लेषणाचा अहवाल प्राप्त करुन दोषारोपपत्र न्यायालयात दाखल केले.

१०. वरील पुराव्यावरुन असे दिसून येते की, फिर्यादी दिपक विठ्ठल मांडवे या साक्षीदाराच्या पुराव्यावरुन त्यांनी दिलेली फिर्याद सिध्द झालेली आहे. तसेच तपासी अंमलदार चंद्रकांत शंकर कुंभार या साक्षीदाराच्या पुराव्यावरुन पंचनामा सिध्द झालेला आहे. परंतु, बबन शंकर शिंदे हे छापा व पंचनाम्यावरील पंच असून त्यांनी अभियोग पक्षास कोणतेही सहाय्य केलेले नाही. तसेच साक्षीदार क्र. १ व ३ यांच्या साक्षीमधील सर्व घटना साक्षीदार क्र. २ ने नाकारल्या आहेत. सबब, जरी अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. १ यांच्या साक्षी अन्वये फिर्याद व साक्षीदार क्र. ३ यांच्या साक्षी अन्वये जप्ती पंचानामा शाबीत झाला असला तरी फिर्यादीमधील व जप्ती पंचनाम्यातील घटना म्हणजेच छापा व जप्तीबाबत साशंकता निर्माण होते.

११. एकंदरीत फिर्यादीच्या साक्षीवरुन आरोपीच्या ताब्यातून मुद्देमाल जप्त केला असे गृहित धरले तरी सदर मुद्देमाल हा देशी दारुच होती हे सिध्द करण्यासाठी रासायकनिक पृथःकरणाचा अहवाल (नि. ३२) सिलबंद स्वरुपात होता किंवा कसे, याबाबत साक्षीदारांच्या साक्षीत काहीही आलेले नाही. तसेच सदर मुद्देमाल ज्या कर्मचा–याने नेला त्या पोलीस कर्मचा–याची साक्ष अभियोग पक्षाने घेतलेली नाही. अशा परिस्थितीत सदर प्रकरणात जप्त केलेला मुद्देमाल हाच प्रयोगशाळेमध्ये पाठविण्यात आला होता किंवा कसे याबाबत सांशकता निर्माण होते. तसेच सदर मुद्देमालामध्ये फेरफार

होण्याची शक्यता नाकारता येत नाही. सबब, सदर प्रकरणातील रासायनिक पृथःकरणाचे अहवालावर विसंबून राहणे योग्य होणार नाही.

१२. तसेच, अभियोग पक्षाने जप्ती पंचनाम्यावरील पंच तपासले परंतु ते अभियोग पक्षास सहकार्य करीत नाहीत. सदर पंच साक्षीदार हे पंचनामा त्यांच्या समक्ष झाल्याबाबत नाकारत आहेत. त्यामुळे रासायनिक विश्लेषणाचा अहवाल अभिलेखावर दाखल असला तरी जप्त मुद्देमाल हा आरोपीच्याच ताब्यात मिळून आला व तो मुद्देमाल देशी दारु होती असा निष्कर्ष काढता येत नाही. सरकार पक्षाच्या एकंदरीत पुराव्यावरुन आरोपीने त्याच्या ताब्यामध्ये स्वतःच्या आर्थिक फायद्याकरीता देशी दारु विक्री करण्याच्या उद्देशाने जवळ बाळगली असे निःसंशयपणे सिध्द झालेले नाही. त्यामुळे मुद्दा क्र. १ चे उत्तर नकारार्थी नोंदवित आहे.

<u>मुद्दा क्र. २ करीताः</u>–

१३. वरील चर्चेअंती हे स्पष्ट होते की, अभियोग पक्ष या खटल्यातील जप्ती पंचनामा शाबीत करु शकलेला नाही. अभियोग पक्ष आरोपीच्या ताब्यात देशी दारुच्या बाटल्या मिळालेचे ठोसपणे शाबीत करु शकलेला नाही. त्यामुळे आरोपीने त्याच्या आर्थिक फायद्याकरीता विनापरवाना देशी दारु विक्री करण्याच्या उद्देशाने स्वतःजवळ बाळगली असा जो दोषारोप ठेवण्यात आलेला आहे, तो निःसंशयपणे शाबीत होत नाही. त्यामुळे वरील विवेचनावरुन व निष्कर्षावरुन मुद्दा क्र. २ करीता खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## <u>आदेश</u>

१. आरोपीची मुंबई मद्यनिषेध कायदा, १९४९ चे कलम ६५(क)(ड) (ई) प्रमाणे असलेल्या गुन्हयातून फौजदारी प्रक्रिया संहिता कलम

२४८(१) अन्वये निर्दोष मुक्तता करण्यात येत आहे.

२. आरोपीचा वैयक्तिक जात मुचलका व जामीन कदबा रद्द करण्यात येत आहे.

३. पोलीस निरीक्षक, बोरगांव पोलीस स्टेशन, सातारा यांना असे आदेशीत करण्यात येते की, अपिलाचा कालावधी संपल्यानंतर, जप्त मुद्देमाल म्हणजे देशी दारु रॉयल चॉईस संत्राच्या सिलबंद बाटल्यांची कायदेशीरमार्गे विल्हेवाट लावावी.

४. आरोपीने फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४३७(अ) नुसार रुपये १५,०००/– चे प्रत्येकी जामीन बंधपत्र सादर करावे.

( न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात जाहीर करण्यात आला. )

Digitally signed by Rohini Vishnu Patil

सातारा. **(आर. व्ही. पाटील )**

दिनांकः ०८/०३/२०२१ ३ रे प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, सातारा.